HAPPY NEW YEAR
HAPPY NEW YEAR

दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक २७७ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.१ जानेवारी २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# पनवेलमध्ये २ कोटी ५० लाखाचे एमडी ड्रग्ज जप्त

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**गुन्हे शाखा कक्ष ३ पनवेलच्या पथकाने धडक कारवाई करीत तालुक्यातील नेरे वाजे रोडवर एका इसमास ताब्यात घेवून त्याच्याकडून जवळपास मारुती गाडीसह २ कोटी ५० लाख रुपये किंमतीचा मेथ्यॉक्युलॉन पावडर (एमडी) हा अंमली पदार्थ हस्तगत केला आहे. याप्रकरणी सदर आरोपीच्या आणखीन दोन साथीदारांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.**



बिपीन कुमार सिंह पोलीस आयुक्त, महेश घुर्ये अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) यांनी 'नशा मुक्त नवी मुंबई' या अभियानाचे अनुशंगाने अंमली पदार्थ खरेदी विक्री व व्यसन करणाऱ्या इसमांवर कारवाई करण्याबाबत आदेश दिले आहेत. त्याप्रमाणे सुरेश मेंगडे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे व विनायक वस्त, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे यांच्या सुचना व मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेकडून ड्रग्ज माफियांचा शोध घेण्यात येत होता.

त्यानुसार संजय फुलक यांना गोपनिय बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार कक्ष ३ गुन्हे शाखा, अंमली पदार्थ विरोधी कक्ष व अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक कक्ष यांनी संयुक्तरित्या कारवाई करुन ३१ डिसेंबरच्या पार्ट्यांसाठी तरुणांना विकण्यासाठी ड्रग्ज आणणारा इसम नामे कलीम रफिक खामकर वय ३९ वर्षे रा. पनवेल, यास ''एम डी '' या अंमली पदार्थासह नेरे येथून ताब्यात घेण्यात आले. त्याचेकडे केलेल्या तपासातून पुढे त्याचे सहकारी जकी अफरोज पिट्टु वय ३३ वर्षे, रा. पनवेल व सुभाष रघुपती पाटील वय ४० वर्षे रा व ता. पेण, जि. रायगड यांना सदर गुन्हयात ताब्यात घेवून नमुद इसमांकडून एकूण २,५०,००,०००/- किंमतीचे २ किलो ५०० ग्रॅम ''एम डी ड्रग्ज'' हा अंमली पदार्थ जप्त केला. या नमुद आरोपीविरुद्ध पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला असून त्यांना सदर गुन्ह्यात अटक करण्यात आलेली आहे.

सर्वात महत्वाचे म्हणजेच प्रथमच एम डी ड्रग्ज तयार करण्याचा कारखाना शोधण्यात यश आले असुन तो सिल करण्यात आला आहे. गुन्हयाचा तपास सुरु आहे. सदर छाप्यात एम.डी. ड्रग्ज, पांढऱ्या रंगाची मारुती स्वीफ्ट, मोबाईल, रोख रक्कम असा मिळून एकूण २ कोटी ५३ लाख ७० हजार ९०० रुपयाचा ऐवज हस्तगत करण्यात आला आहे. सदर कामगिरीकरीता कक्ष-०३, गुन्हे शाखेचे वपोनि शत्रुघ्न माळी, सपोनि सागर पवार, पोहवा मोरे, पोहवा कोळी, पोना पाटील, पाटील, जेजूरकर, फुलकर, बोरसे, सोनवलकर, तसेच एएचटीयु चे वपोनि पराग सोनावणे, तसेच अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे वपोनि बी एस सय्यद, पोउपनि विजय शिंगे, सपोउपनि इनामदार, पोहवा उटगीकर, पिरजादे, कांबळे यांनी महत्वपुर्ण कामगीरी बजावली आहे.

## उरण काळाधोंडा येथील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे विविध मागण्यांसाठी पुन्हा साखळी उपोषण



**दै.रायगड नगरी । जीवन केणी**

**उरण** : उरण काळाधोंडा येथील स्थानिक भूमीपुत्र असलेल्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या विविध मागण्या असून यामध्ये २०१३ च्या केंद्राच्या भूसंपादन कायद्याप्रमाणे बाधित शेतकऱ्यांना मोबदला मिळावा. भविष्यात काळाधोंडा रेल्वे स्टेशन कार्यालयात जी कामगारांची भरती होईल त्यात शंभर टक्के भरती ही काळाधोंडा रेल्वे प्रकल्पग्रस्तांची करण्यात यावी. रेल्वेची कामे प्रकल्पग्रस्तांना देण्यात यावीत. हाऊसकिपींगच्या कामात रेल्वे प्रकल्पग्रस्तांना प्राधान्य देण्यात यावे.

रेल्वे स्थानक आवारातील व्यापारी दुकानें, गाळे ही सरकारी फी आकारून मालकी हक्काने किंवा भाडे तत्वावर सरकारी फी आकारून प्रकल्पग्रस्तांना देण्यात यावे.

बाधित शेतकऱ्यांना प्रकल्पग्रस्त दाखला देण्यात यावा. सदर रेल्वे स्टेशनला उरण कोट हे नाव देण्यात यावे या विविध मागण्या संदर्भात आजतागायत साखळी उपोषण सुरु आहे.तरी अजूनही या शेतकऱ्यांना न्याय मिळालेले नाही. अजूनही शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य झालेल्या नाहीत त्यामुळे आता थेट महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, लोकनेते माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांनीच यात लक्ष घालावे अशी मागणी आता उरण तालुक्यातील काळाधोंडा येथील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी केली आहे.

सविस्तर वृत्त असे की .../२

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील जलजीवन मिशन; भाताणकरांना नववर्षाची भेट

**दै.रायगड नगरी । पनवेल**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील जलजीवन मिशन अंतर्गत 'हर घर नल, हर घर जल' नुसार भाताण गावात ७१ लाख ५७ हजार रुपयांची नळ पाणी पुरवठा योजना राबविण्यात येणार असून या विकासकामांचे भूमिपूजन शनिवार दिनांक ०१ जानेवारी रोजी सायंकाळी ४. ३० वाजता आयोजित करण्यात आला आहे.

भाताण गावात होणाऱ्या या योजनेचे भूमिपूजन विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रविण दरेकर, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते होणार आहे.

## संक्षिप्त...

### राज्यात करोनाचा विस्फोट; आज ८ हजार रुग्णांचे निदान

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात गेल्या २४ तासांत ८ हजार ०६७ नवीन रुग्णांची नोंद झाली आहे. तर, ८ करोना बाधित रुग्णांचे निधन झाले आहे. आरोग्य विभागाने आकडेवारी जारी केली आहे.

राज्यात करोना रुग्णांची झपाट्याने वाढत असलेली संख्या आणि ओमिक्रॉन विषाणूचा संसर्ग वाढत आहे. मुंबई, ठाणे, पुणे येथे करोना रुग्ण संक्रमण दर वाढत आहे. त्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने निर्बंध कठोर केले आहेत. तसंच, लग्न तसेच अन्य कार्यक्रमांसाठी हॉलमध्ये होणारी गर्दी टाळण्यासाठी काटेकोर उपाययोजना करण्याबतचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. ओमिक्रॉन रुग्णांची संख्याही राज्याची चिंता वाढवणारी आहे. राज्यात एकूण ४५४ ओमिक्रॉन रुग्ण आहेत.

आज राज्यात करोना रुग्णांची संख्या झपाट्याने वाढली आहे. गेल्या २४ तासांत तब्बल ८ हजार ०६७ नवीन रुग्णांचे निदान झाले आहे. त्यामुळं आरोग्य प्रशासनाच्या चिंतेत वाढ झाली आहे. तर, आज दिवसभरात ८ करोना बाधित रुग्णांचा मृत्यू झाला आहे. आजपर्यंत तपासण्यात आलेल्या ६,९०,१०,१५३ प्रयोगशाळा नमुन्यांपैकी ६६,७८,८२१ (९.६८ टक्के) नमुने पॉझिटिव्ह आले आहेत.

आज दिवसभरात १ हजार ७६६ रुग्ण बरे होऊन घरी परतले आहेत. राज्यात आजपर्यंत एकूण ६५,०९,०९६ करोना बाधित रुग्ण बरे होऊन घरी. यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९७.४६% एवढे झाले आहे. सध्या राज्यात १,७५,५९२ व्यक्ती होमक्वारंटाईनमध्ये आहेत तर १०७९ व्यक्ती संस्थात्मक क्वारंटाईनमध्ये आहेत.

## विनामास्क फिरणाऱ्यांवर कर्जत नगरपरिषदेची दंडात्मक कारवाई

**दै.रायगड नगरी । संजय गायकवाड**

**कर्जत** : कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव अजून संपला नाही. कोरोनाबाधीत रूग्णांची संख्या आता पुन्हा वाढू लागली आहे. त्यात ओमीक्रॉँन व्हेरीयंट चा प्रादुर्भाव वाढत आहे, आरोग्य विभाग आणि प्रशासनाकडून नागरीकांना मास्कचा वापर करा. सॅनिटायझरचा वापर करा, सोशल डिस्टन्सिंगचे पालन करावे, असे आवाहन वारंवार करण्यात येत आहे. तरी नागरिक बाजार पेठेत विना मास्क फिरत आहेत अश्यावर कर्जत नगरपरिषद दंडात्मक कारवाई करत आहे. .../२



## उरणचे तहसीलदार आणि पर्यावरण वाद्यांना शिविगाळ व धमकी प्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । उरण**

पर्यावरणवाद्यांच्या मागणी नंतर पाणजे पाणथळीतील पाण्याचे मार्ग मोकळे खुले करण्यात आले. मात्र यामुळे गावातील क्रिकेट खेळणाऱ्यांचा रोष ज्यांच्या मुळे या पाण-थळी मोकळ्या करण्यात आल्या त्या पर्यावरणवाद्यांवर आणि शासकीय अधिकाऱ्यांवर राहीला. त्याचाच परिणाम म्हणून गुरूवारी या पाणथळीची पहाणी करण्यासाठी आलेल्या तहसिलदार आणि पर्यावरण वाद्यांना गावातील तरूणांकडून शिविगाळ आणि धमकी देण्यात आली.

या प्रकरणी न्हावाशेवा पोलिस ठाण्यात पाणजे येथिल धर्मेंद्र गोविंद पाटीलआणि हेमंत प्रकाश पाटील यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पर्यावरण वाद्यांच्या तक्रारी नंतर पाणजे पाणथळीत येणारे पाण्याचे प्रवाहाचे मार्ग मोकळे करण्याचे उच्च न्यायालयाने निर्देश दिल्यानंतर सिडको, एनएमएसईझेड आणि तहसिलदारांनी हे मार्ग मोकळे केले.मात्र त्यामुळे येथिल क्रिकेट खेळण्याच्या ग्राऊंडमध्ये पाणी साचू लागले त्यामुळे गावातील मुलांनी हे मार्ग पुन्हा बंद केले.

त्यामुळे पर्यावरणवाद्यांनी या बाबत पुन्हा तक्रारी करण्यास सुरूवात केली. त्याच तक्रारीच्या अनुषंगाने उरणचे तहसिलदार भाऊसाहेब अंधारे, वन परिक्षेत्र अधिकारी शशांक कदम, मंडल अधिकारी, तलाठी, सिडकोचे पर्यावरण विभागाचे प्रमोद पाटील, पर्यावरण वादी आणि एकविरा आई प्रतिष्ठानचे नंदकुमार पवार, देबी गोयंका आणि इतर हे या पाणथळीची पहाणी करण्यासाठी गेले असताना त्यांना ग्रामस्थांच्या रोषाला सामोरे जावे लागले.

धर्मेंद्र पाटील आणि हेमंत पाटील या दोन तरूणांनी तर नंदकुमार पवार आणि तहसिलदार .../२

## कोविड संपला असे गृहीत धरू नका शासनाचे नियम पाळा : कनशेट्टी

**दै.रायगड नगरी । संजय रिकामे**

**तळा** : कोविड - १९ विषाणूचा ओमिक्रॉन हा नवीन प्रकार जगभरात वेगाने फैलावत असून कोविड संपला असे गृहीत धरू नका शासनाचे नियम पाळा असे नम्र आवाहन तळा तहसीलदार कनशेट्टी यांनी तळा व्यापारी असोसिशन बैठकीत केले यावेळी तळा पोलिस निरीक्षक ओमासे, व्यापारी असोसिशनचे अध्यक्ष श्रीराम कजबजे, उपाध्यक्ष पटेल माजी नगरसेवक चंद्रकांत रोडे, तळा प्रेस क्लब अध्यक्ष संजय रिकामे, पत्रकार किशोर पितळे, श्रीकांत नांदगावकर, भाजी विक्रेते, मिनिडोर संघटनेचे पदाधिकारी, व्यापारी वर्ग, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले की, तिसरी लाट आल्यास आरोग्य यंत्रणेवर मोठा ताण निर्माण होऊ शकतो. कोविडची तिसरी लाट येऊ नये म्हणून शासन आणि प्रशासन वारंवार आवाहन करित असतानाही त्याचे बहुतांश ठिकाणी योग्यरित्या पालन केले जात नसल्याचे निदर्शनास येत आहे. विशेषतः लग्न समारंभ आणि इतर समारंभांमध्ये नियम मोडले जात असल्याचे आढळते आहे. त्यामुळे सर्व नागरिकांनी शासनाने आखून दिलेल्या मर्यादांचे योग्य पालन करावे, कोणत्याही प्रकारची गर्दी टाळावी, मास्क लावण्यासह कोविड प्रतिबंधात्मक नियमांचे पालन करावे, प्रत्येकाने लसीकरण पूर्ण करुन घ्यावे. नियम मोडणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी नगरपंचायत आणि पोलिस प्रशासन स्तरावर पथक कार्यरत राहील. लग्न व इतर समारंभांमध्ये उपस्थितीची मर्यादा काटेकोरपणे पाळावी .हॉटेल्स, उपहारगृह आदी ठिकाणी नियमांचे योग्य पालन करावे. नववर्ष स्वागताचे समारंभ आयोजन टाळावे.मास्कचा वापर करावा, कोविड लसीकरण पूर्ण करुन घ्यावे. दरम्यान, नियमांची पायमल्ली करणाऱ्यांवर नगरपंचायत स्तरावरील पथकांकडून तसेच पोलीस प्रशासनाकडून सक्त कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी नमूद केले आहे. नाताळ (ख्रिसमस), नवीन वर्ष स्वागतासाठी पार्ट्यांचे आयोजन करणे टाळावे, समारंभांमध्ये गर्दी करु नये, कोविड प्रतिबंधात्मक वर्तन राखावे, असे आवाहन पुनश्चः एकदा तहसीलदार कनशेट्टी यांनी प्रशासनाच्या वतीने केले आहे.



# करोना काळातील लोकशाही

करोनाच्या भयाने देशातील लोकशाही प्रक्रियेला खीळ बसता कामा नये, हा निवडणूक आयोगाचा निर्धार स्वागतार्ह आणि कौतुकास्पद आहे; मात्र तो अमलात आणताना, काटकोर नियमपालन होण्यासाठी आयोगाने आपली मवाळ भूमिका सोडून राजकीय पक्षांना कठोरपणे समज देण्याची आवश्यकता आहे. उत्तर प्रदेश या सर्वांत मोठ्या राज्यासहित येत्या काही काळात उत्तराखंड, पंजाब, मणिपूर आणि गोवा अशा एकूण पाच राज्यांमध्ये विधानसभेच्या निवडणुका होत आहेत. गेले काही दिवस केंद्रीय निवडणूक आयोग या निवडणुका पुढे ढकलणार की काय, असा संभ्रम निर्माण झाला होता. या निवडणुकांबाबत आयोगाने घेतलेल्या निर्णयाचा परिणाम, महाराष्ट्रासहित अनेक राज्यांमधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवरही पडला असता. काही दिवसांपूर्वी घटनात्मक पद सांभाळणारे सगळे निवडणूक आयुक्त विचारविनिमय करण्यासाठी पंतप्रधानांच्या कार्यालयात गेल्यानेही अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या; मात्र उत्तर प्रदेशातील तयारीचा आणि परिस्थितीचा सलग तीन दिवस आढावा घेतल्यानंतर, लखनौमध्ये घेतलेल्या पत्रकार परिषदेत मुख्य निवडणूक आयुक्त सुशीलचंद्र यांनी उत्तर प्रदेशातील निवडणूक ठरल्याप्रमाणेच पार पडेल, असे स्पष्ट शब्दांत जाहीर केले. यामुळे, इतरही चार राज्यांमधील निवडणूक वेळापत्रक बदलण्याची आवश्यकता नाही, हेही आपोआपच स्पष्ट झाले. निवडणूक आयोगाने मतदानाची वेळ एका तासाने वाढविण्याचा निर्णय आधीच घेतला होता. तसा तो पश्चिम बंगालच्या निवडणुकीतही झाला होता. वेळ पडल्यास ही वेळ आणखी वाढवावी. शिवाय, ११ हजार नवी मतदान केंद्रे उत्तर प्रदेशात असतील; त्यामुळे प्रत्येक केंद्रावरचा ताण कमी होईल. अतिवृद्ध; तसेच अपंग मतदारांना घरातूनही मतदान करता येणार आहे. आयोगाच्या या निर्णयाचे विशेष स्वागत करायला हवे. आयोगाने ज्येष्ठांची वयोमर्यादा सध्या ८० ठरविल्याचे कळते. ती खाली आणायला हवी. सुशीलचंद्र यांनी साऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना दोन्ही लसमात्रा आणि गरज पडली, तर बूस्टर देण्याची तयारी दाखविली आहे. यामुळे, कर्मचाऱ्यांचे मनोबल वाढेल. महाराष्ट्रासारख्या राज्याने केंद्रीय निवडणूक आयोग हे जे जे करीत आहे; ते आत्ताच लक्षात घ्यावे. महाराष्ट्रातील मुंबईसहित २२ महापालिका, अनेक नगर परिषदा; तसेच इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आता दूर नाहीत. त्याही पुढे ढकलण्याची आफत ओढवायची नसेल, तर राज्यातही याच स्वरूपाची यंत्रणा उभारावी. मतदान केंद्रे वाढवावीत; तसेच सर्व ज्येष्ठांना घरातून मतदानाची सुविधा द्यावी. असा विचार केला, तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ठरल्याप्रमाणे होतील. या लोकशाहीच्या प्रक्रियेत, निवडणूक आयोगाने राजकीय पक्षांवर प्रचारतंत्र बदलण्यासाठी दबाव आणण्याची गरज आहे. आज देशात करोनाची तिसरी लाट वेग पकडते आहे. तो वेग कमी करण्यात किती यश येईल, याचा अंदाज बांधणे शक्य नाही. अशा वेळी, जाहीर सभा व मेळावे घेऊन मतदारांचे प्राण धोक्यात आणू नका, असे निवडणूक आयोग पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासहित सर्व पक्षांच्या सर्वच प्रचारक नेत्यांना का खडसावत नाही? सुशीलचंद्र यांनी ज्याप्रकारे निवडणूक पार पाडण्यासाठी प्रशासकीय निर्णयांची मोठी व आश्वासक जंत्री माध्यमांना गुरुवारी सादर केली; त्याच प्रकारे करोनाकाळातील नियम तुम्हाला मोडता येणार नाहीत, असे सर्व पक्षांना बजावताना आयोग कमी का पडतो आहे? आज कधी नव्हे इतका इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा विस्तार झाला आहे. कोट्यवधी भारतीय नागरिक अहोरात्र मोबाइल फोन; तसेच कम्प्युटर वापरित आहेत. अशा वेळी, नेते आणि पक्षांनी प्रचारतंत्र बदलावे. यातील प्रमुख जबाबदारी सत्ताधारी पक्ष म्हणून भारतीय जनता पक्षाची आणि विशेषकरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आहे. पश्चिम बंगालमध्ये प्रचारात सगळे नियम धाब्यावर बसवले गेले. त्याची किंमत नंतर चुकवावी लागली. असे होता कामा नये. जगात ज्या देशांमध्ये तिसरी लाट ओसरली आहे; तिथे चौथ्या लाटेचा सामना करण्याची तयारी चालू आहे. असेच भारतातही होऊ शकते. याचा अर्थ इतकाच, की आपण साऱ्यांनी पुढचा काही काळ करोनासोबतच जगण्याची सवय लावून घेण्याची आवश्यकता आहे. तसे जर असेल, तर प्राण धोक्यात घालून हे का करायचे? देशातील लोकशाही प्रक्रियेला खीळ बसू नये, यासाठी सर्व राजकीय पक्षांनी आणि निवडणूक आयोगाने घेतलेली भूमिका जशी स्वागतार्ह आहे; तशीच ही निवडणूक निर्विघ्न पार पाडणे, ही सर्वांनी आपली जबाबदारी मानायला हवी. काही दिवसांपूर्वी विधिमंडळात महाराष्ट्रातील निवडणुकांवर चर्चा होत असताना, उत्तर प्रदेशाचा हवाला देण्यात येत होता. आता तेथे आयोग निवडणूक घेत असेल, तर महाराष्ट्र सरकारनेही सर्वतोपरी काळजी घेऊन लोकशाही प्रक्रिया पुढे नेण्याचा निकाल घ्यावा.

# एकाच पंचवार्षिक मध्ये पत्नी सरपंच आणि पती उपसरपंच

## शरद धावजी ठाकूर यांचे धुतूम गावाच्या उपसरपंच पदी निवड



**दै.रायगड नगरी । उरण**

धुतुम ग्रामपंचायत मध्ये उपसरपंच पदाची निवडणूक सरपंच रेश्मा शरद ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली पार पाडली, या निवडणुकीमध्ये शेकाप परिवर्तन आघाडीचे उमेदवार शरद धावजी ठाकूर विजयी झाले. ६ विरुद्ध ४ अश्या फरकाने विजयश्री प्राप्त झाला. निवडणूक अधिकारी म्हणून ग्रामसेवक मोरे साहेब यांनी पदभार सांभाळला.

आज ठरल्या प्रमाणे आमच्या कारकिर्दीतील शेवटचा पाचवा उपसरपंच म्हणून शरद ठाकूर यांची निवड झाली असून धुतूम गावच्या इतिहासात प्रथमच एकाच वेळी पत्नी सरपंच आणि पती उपसरपंच झाल्याची नोंद झाली आहे.

यावेळी कुठलाही गाजा वाजा न करता फक्त शुभेच्छा देण्याचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाला सरपंच रेश्मा शरद ठाकूर, माजी सरपंच धनाजी शेठ ठाकूर, माजी उपसरपंच सदानंद ठाकूर,माजी उपसरपंच वैशाली ताई पाटील, माजी उपसरपंच आशा महेंद्र ठाकुर, माजी उपसरपंच सविता रुपेश ठाकूर, माजी उपसरपंच सुंदर पाटील, डी आर ठाकूर ज्येष्ठ नेते, श्याम भाई ठाकूर, तंटामुक्त अध्यक्ष दत्ता धावजी ठाकूर, प्रभाकर हरिश्चंद्र ठाकुर ,दत्ता हरिश्चंद्र ठाकूर, राजेश शेठ ठाकूर, आर एन ठाकूर, दिलीप धावजी, विकास धावजी, निवास ठाकूर, जयेश घरत, जयेश राजाराम घरत, संतोष ठाकूर , तुकाराम ठाकूर, मेघनाथ ठाकूर, सुनील ठाकूर,प्रकाश परशुराम ठाकूर, महिंद्र ठाकूर, किशोर पाटील, नामदेव महादेव ठाकूर, प्रवीण पाटील, प्रकाश पुंडलिक ठाकूर व अनेक मान्यवरांनी मोबाईल, व्हॉटसअप आदी सोशल मीडियाच्या माध्यमातून शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच शरद ठाकूर यांना शुभेच्छा देण्यासाठी त्यांचे कुटुंबीय व मित्र परिवार मोठ्या संख्येने सोशल, फिजिकल डिस्टन्स ठेऊन मास्क व सॅनिटाईझरचा वापर करून उपस्थित होते.

# तोराडी मार्गांवरील एस. टी. ची बस सेवा गेली तीन महिने बंद

**दै.रायगड नगरी । उदय कळस**

**म्हसळा** : म्हसळा तालुक्यातील तोराडी हा अतिशय दुर्गम आणी डोंगराळ भाग. स्वतःच्या खासगी वाहनाशिवाय प्रवासाशिवाय वाहतुकीचे अन्य साधन अतिशय दुर्मिळ असणारा हा खाडी किनारपट्टी भाग. या भागातून रोज किमान १०० विद्यार्थी शिक्षणासाठी माणगाव, लोणेरे, गोरेगाव मार्गांवर प्रवास करतात.

या भागात महाड डेपोची बस माणगाव -आंबेत -पांगलोली -तोराडी असा प्रवास करायची त्यामुळे या भागातील सर्वसामान्य जनता आणी शालेय विद्यार्थिना कोणत्याही आणी कसल्याही प्रकारची प्रवासाची गैरसोय होता नव्हती. मात्र गेल्या तीन महिन्यांपासून एस. टी. प्रशासनाने या मार्गांवरील एस. टी. प्रवास सेवा बंद केल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान तर होतेच शिवाय सर्वसामान्य जीवन पूर्णपणे विस्कळीत होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (मुंबई ) अध्यक्ष महेश शिर्के यांनी महाड डेपो चे व्यवस्थापक यांना निवेदन देऊन सदराची एस. टी. फेरी त्वरित सुरु करण्यासाठी निवेदन दिले असून पालक मंत्र्यांनी या मागणीकडे लक्ष देऊन माणगाव -आंबेत -पांगलोली -तोराडी च्या दिवसातून तीन फेऱ्या सुरु करण्याची विनंती केली आहे.

# इ.१० वी विद्यार्थ्यांना महत्त्वपुर्ण मार्गदर्शन

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

शैक्षणिक उपक्रम संशोधिका ज्ञान प्रबोधिनी पुणे व एक्सेल इंडस्ट्रीज धाटाव अंतर्गत स्वामी विवेकानंद रिसर्च अँण्ड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट यांच्या वतीने रोहे तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब या शिक्षण संस्थेचे श्रमिक विद्यालय चिल्हे येथे इ.१० वी विद्यार्थी विशेष मार्गदर्शनपर कार्यशाळा मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आली.

एक्सेल इंडस्ट्रीज स्वामी विवेकानंद रिसर्च अँण्ड ट्रेनिंग इन्स्टिट्यूटचे कार्यक्रम प्रमुख सुशील रूळेकर यांच्या तसेच सर्व टीमच्या विशेष सहकार्याने संपन्न झालेल्या या कार्यशाळेत इ.१० वी परीक्षा पूर्व तयारी कशी करावी, पेपर कसे सोडवावेत, कमी वेळात अधिक अभ्यास कसा करावा,इपले उद्दिष्ट साध्य कसे करावे आदीबाबत महत्वपुर्ण मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी तज्ञ मार्गदर्शक श्रीरंग टोके,प्रसाद भोईर, मुख्याध्यापक दिपक जगताप, नरेंद्र माळी,महेंद्र जवरत,शिवनाथ दराडे,पांडुरंग शिद आदी उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत माझे अशिलाने प्रस्ताविक जमीन मालक १) श्री.बाबुराव कृष्णा कांबळे, २) श्री.कमळाकर कृष्णा कांबळे, ३) चंद्रकांत कृष्णा कांबळे, ४) पुष्पा लहू कांबळे, ५) स्वप्नील लहू कांबळे, ६) संदेश लहू कांबळे, ७) सुरज लहू कांबळे या जमीन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. तरी सदर जमीन मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : पिसार्वे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| गावाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|
| पिसार्वे | १२/८ | ०-२६-६० पो.ख. ०-०२-५० एकूण ०-२९-१० | २.७५ |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या जमीन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार-मदार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणीवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड.श्री.दिपक आर. शेळके**
**डी-३/१, किनारा हौ.सो.बावन बंगलो,**
**ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.नं.९८२०७९५६०५**


# समृद्ध महाराष्ट्र, बलशाली भारत घडवण्यासाठी एकजूट होऊया, आव्हानांवर मात करूया : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**



थांबायचं नाही. पण सतर्क आणि सावध राहायला हवे. कितीही आव्हाने येऊ देत. त्यावर आपण मात करूया. नव्या वर्षात हीच हिंमत बांधुया. आरोग्यदायी, समृद्ध महाराष्ट्र आणि बलशाली भारत घडवण्यासाठी एकजूट होऊया, अशा शब्दांत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. नवीन वर्ष आपल्या सगळ्यांच्या आयुष्यात सुख, समृद्धी आणि भरभराट घेऊन येवो. त्यासाठी आरोग्यदायी संकल्प करूया, असेही मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

नववर्षाचे स्वागत करताना जगावर आलेल्या कोरोना संकटाचे भान राखावे. गर्दी नकोच आणि आपल्या वागण्यातून, बेफिकिरीतून संसर्ग वाढीला हातभार लागणार नाही, याची खबरदारी घ्यावी असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी नववर्ष प्रारंभाच्या पूर्वसंध्येला केले आहे.

मुख्यमंत्री संदेशात म्हणतात, नवे वर्ष हे आपल्याला नवनवीन संकल्पांसाठी प्रेरणा देते. अनेकजण अडथळ्यांना दूर सारून नवे संकल्प करतात. नव्या उमेदीने उभे राहतात. याच उभारीतून एक-एकजण म्हणता-म्हणता आपला समाज आणि आपण आव्हानांवर मात करण्यासाठी सज्ज होतो. हीच जिद्द बाळगून आपल्याला पुढे जायचे आहे. नवनवीन संकल्पांसाठी सिध्द व्हायचे आहे. कितीही आव्हाने येऊ देत त्यांच्या छाताडावर उभे राहून यशाला गवसणी घालण्याची हिंमत बांधायची आहे. यातूनच आपल्याला समृद्ध महाराष्ट्र आणि पर्यायाने बलशाली भारत घडवायचा आहे. त्यासाठी आणि नवीन वर्ष आरोग्यदायी ठरेल, ते आपल्या सगळ्यांच्या आयुष्यात सुख, समृद्धी आणि भरभराट घेऊन येईल याकरिता मनःपूर्वक शुभेच्छा आणि नववर्षाभिनंदन.

# विद्यार्थ्यांनी उत्तम माणूस होण्याचे स्वप्न बाळगावे : डॉ.मिलींद भगत

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

विद्यार्थ्यांनी दररोज पंचेचाळीस मिनीटे तरी व्यायाम करणे आवश्यक असून शिक्षण नुसते पैसे कमविण्यासाठी न घेता खऱ्या अर्थाने ज्ञान मिळविण्यासाठी घ्यावे आणि प्रथम उत्तम माणूस होण्याचे स्वप्न बाळगावे, असे आवाहन कॅप्टन डॉ.मिलिंद भगत यांनी केले. पोलादपूर तालुक्यातील सहयोग प्रतिष्ठान यांच्या वतीने तालुक्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परिक्षेत यश मिळविणाऱ्या विद्यालयांचा व विद्यार्थ्यांचा तसेच आदर्श शिक्षक आणि गुणवंतांचा सत्कार करण्याचा शानदार गुणगौरव सोहळा साने गुरुजी विद्यालयाच्या प्रांगणात झाला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरेचे अधिव्याख्याते कॅप्टन डॉ.मिलींद भगत तर अध्यक्षस्थानी सहयोग प्रतिष्ठान पोलादपूरचे कार्याध्यक्ष रमेश चव्हाण हे उपस्थित होते. यावेळी व्यासपिठावर वरिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी सुभाष साळुंखे, सहयोगचे कार्यवाह काठाळे व विश्वस्त सुरेंद्र जाधव, सुभाष ढाणे, सुखदेव मोरे, मदन एकबोटे, किसन सुरवसे, विजय दरेकर, लीलाजी शेडगे, अ.वि. जंगममास्तर तसेच मुख्याध्यापक पाटील, मुख्याध्यापिका सुगंधा वाढवळ, साधना चिकणे तसेच संजना शिंदे या उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीस हॅलीकॅप्टर दुर्घटनेत शहिद झालेले सी.डी.एस. बिपिन रावत व त्यांच्या पत्नी तसेच लष्करी अधिकारी यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली व नंतर साने गुरुजी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सुखदेव मोरे यांच्या नेतृत्वाखाली संचालन करून प्रमुख पाहुणे कॅप्टन डॉ. मिलिंद भगत यांना मानवंदना दिली. दीप प्रज्वलन करून स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. काठाळे यांनी प्रस्तावना केल्यावर विद्यार्थी व शिक्षकांनी तसेच वरिष्ठ गटशिक्षण अधिकारी सुभाष साळुंखे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## विनामास्क फिरणाऱ्यावर कर्जत नगरपरिषदेची दंडात्मक कारवाई

कर्जत हे तालुक्याचे ठिकाण आहे त्यामुळे कर्जत शहरात मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे, कोरोना बाधितांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. शासनाने आता नवीन निर्बध लावले आहेत, या पार्श्वभूमीवर कर्जत नगरपरिषद विना मास्क फिरणाऱ्यावर काल दि.३० डिसेंबर आणि आज ३१ डिसेंबर रोजी ४२ जणांवर प्रत्येकी ५०० रुपये प्रमाणे दंडात्मक कारवाई २१ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.

कर्जत बाजारपेठेत मुख्याधिकारी डॉ.पंकज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात तीन पथक बनविण्यात आली आहेत, ही पथके विनामास्क फिरणाऱ्यावर दंडात्मक कारवाई करीत आहेत, शासनाने नियम ठरवून दिले आहेत त्याचे पालन करा असे आवाहन मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी केले आहे.

## शिविगाळ व धमकी प्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल

भाऊसाहेब अंधारे यांना शिविगाळ करून धमकावले. एका पर्यावरण वाद्याला या दोन तरूणांनी मारहाण केली. अखेर या सर्वांना पोलिस बंदोबस्तात तेथून बाहेर काढण्यात आले. त्यानंतर या बाबत न्हावा शेवा पोलिस ठाण्यात धर्मेंद्र पाटील आणि हेमंत प्रकाश यांच्या विरोधात तक्रार देण्यात आली. त्यांच्या विरोधात भा.दं.वि. ३२३, ३४, ३४१, ३५३, ५०४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून न्हावाशेवा पोलिस या प्रकरणी अधिक तपास करीत आहेत.

## शेतकऱ्यांचे विविध मागण्यांसाठी पुन्हा साखळी उपोषण

उरण तालुक्यातील कोटनाका-काळाधोंडा येथील प्रकल्पग्रस्तांच्या जमिनी रेल्वे प्रकल्पा करिता रेल्वे व सिडको प्रशासन मार्फत संयुक्त रित्या संपादित करण्यात आली त्याबदल्यात प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना कोणतेही नुकसान भरपाई मिळाले नाही. त्यामुळे आक्रमक झालेल्या संतप्त शेतकऱ्यांनी २७ नोव्हेंबर २०२० पासून कोटनाका येथे रेल्वे प्रकल्पाचे काम बंद करत साखळी उपोषणाला सुरवात केली.मध्येच कोरोना रोगाच्या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनाच्या विनंती नुसार कोरोना रोगाचा प्रसार होऊ नये याकरिता सदर साखळी उपोषण हे ८४ व्या दिवशी तात्पुरते स्वरूपात रद्द करण्यात आले होते.

मात्र शेतकऱ्यांना न्याय न मिळाल्याने ते साखळी उपोषण पुन्हा दिनांक १५ नोव्हेंबर २०२१ रोजी सुरु झाले आहे. जो पर्यंत मागण्या पूर्ण होत नाही तोपर्यंत हे साखळी उपोषण असेच सुरु राहणार असल्याचे मत नवनीत भोईर, योगेश गोवारी, निलेश भोईर यांनी व्यक्त केले .मात्र मागण्या पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा स्थानिक रेल्वे प्रकल्पग्रस्त शेतकरी कृती सेवा संस्था काळाधोंडा व कोट ग्रामसुधारणा मंडळाचे पदाधीकारी कार्यकर्त्यांनी दिला आहे. यावेळी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी उपोषण स्थळी नवनीत भोईर, योगेश गोवारी, हेमदास गोवारी, सुनील भोईर, सुरज पाटील, भालचंद्र भोईर, महेश भोईर, कृष्णा जोशी, पुरषोत्तम पाटील, सुरेश पाटील, चेतन पाटील, प्रसाद गोवारी, अजित भोईर, राजेश भोईर आदी स्थानिक रेल्वे प्रकल्पग्रस्त शेतकरी कृती सेवा संस्था काळाधोंडा व कोट ग्रामसुधारणा मंडळाचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.


महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in
Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

धारिका क्रमांक : डीआरए-०५२१/प्र.क्र.७१/२०२१/जाहिरात दिनांक : ३१ डिसेंबर २०२१

आयोगामार्फत सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आस्थापनेवरील खालील संवर्गातील पद भरतीसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत :-

| जाहिरात क्रमांक | पदाचे नाव | एकूण पदसंख्या |
|---|---|---|
| २७२/२०२१ | जिल्हा शल्य चिकित्सक संवर्ग, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ | १७२ |
| २७३/२०२१ | जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्ग, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ | ४२ |
| २७४/२०२१ | शरीरविकृती शास्त्रज्ञ, विशेषज्ञ संवर्ग, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ | १२ |
| २७५/२०२१ | मनोविकृती चिकित्सक, विशेषज्ञ संवर्ग, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ | २० |
| २७६/२०२१ | नेत्र शल्यचिकित्सक, विशेषज्ञ संवर्ग, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ | १७ |
| २७७/२०२१ | बधिरीकरण तज्ञ, विशेषज्ञ संवर्ग, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ | १५ |
| २७८/२०२१ | क्ष किरण शास्त्रज्ञ, विशेषज्ञ संवर्ग, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ | २१ |
| २७९/२०२१ | अस्थिव्यंगोपचार तज्ञ, विशेषज्ञ संवर्ग, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ | ०५ |
| २८०/२०२१ | वैद्यकीय अधिकारी (स्त्रीरोग व प्रसुती तज्ञ), विशेषज्ञ संवर्ग, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ | २८ |
| २८१/२०२१ | वैद्यकीय अधिकारी (कान, नाक, घसा तज्ञ), विशेषज्ञ संवर्ग, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ | ०९ |
| २८२/२०२१ | वैद्यकीय अधिकारी (क्षयरोग चिकित्सा) विशेषज्ञ संवर्ग, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ | १५ |
| २८३/२०२१ | वैद्यकीय अधिकारी (बालरोग तज्ञ), विशेषज्ञ संवर्ग, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ | १४ |

२) प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशिल दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, पदांचा प्रवर्गनिहाय तपशिल, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in व http://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या माहितीचे तसेच सविस्तर जाहिरातीचे कृपया अवलोकन करावे.

३) ऑनलाईन अर्ज www.mpsc.gov.in या संकेतस्थळाद्वारे दिनांक १ जानेवारी, २०२२ ते दिनांक २१ जानेवारी २०२२ या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

४) आयोगाच्या www.mpsc.gov.in तसेच http://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

ठिकाण : मुंबई सह सचिव (जाहिरात), महाराष्ट्र लोकसेवा आयोग


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## श्रीवर्धन येथे भुमिहिन शेतमजुरांना दाखले वाटपाचा कार्यक्रम

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन येथे पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेच्या अमलबजावणी साठी भुमिहिन शेतमजुरांना योजनेकामी लागणारे भुमिहिन, वय-अधिवास व उत्पन्न दाखले वाटप सदर योजनेचे तालुका स्तरिय उपसमितीचे अध्यक्ष श्रीवर्धन तालुका उपविभागीय अधिकारी तथा प्रांत अमित शेडगे यांच्या हस्ते करण्यात आले. सदर दाखले वाटप कार्यक्रमास तालुका स्तरिय उपसमितीचे सदस्य तथा श्रीवर्धन तालुका तहसीलदार सचिन गोसावी निवासी नायब तहसिलदार पज्ञा काकडे यांच्या पमुख उपस्थितीत करण्यात आला.महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागातर्फे कार्यक्रमासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. सदर दाखले वाटपाचा कार्यक्रम महाराष्ट्र शासन व भिमशक्ती सामाजिक संघटना महाराष्ट्र पद्रेशचे सरचिटणीस श्री. गोपाळराव यशवंतराव तंतरपाळे यांच्या पय़त्नाने महाराष्ट्र शासन व भिमशक्ती सामाजिक संघटना यांच्या संयुक्त विध्यमाने आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रमास सबळीकरण योजनेचे रायगड जिल्हा पचारक ऊमेश लांगी , श्रीवर्धन तालुक्यातील सबळीकरण योजनेचे कार्यकर्ते अनिल कडु, श्रीमती. मोहिनी शिर्के व ऊर्मिला जाधव यांची ऊपस्थिती लाभली. सदर दाखले वाटप समारंभात उपविभागीय अधिकारी श्रीवर्धन यांनी उपस्थित लाभार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन दिनेश खैरे यांनी केले तर ऊपस्थित मान्यवर व लाभार्थ्यांचे आभार दिपक शिर्के यांनी मानुन कार्यक्रमची सांगता करण्यात आली.

## महाराष्ट्र शिव माथाडी कामगार सेनेच्या उपाध्यक्षपदी अरुण स्वरूप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने पक्ष प्रमुख उध्दव ठाकरे मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशा नुसार, पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय कामगार सेना (महासंघ) संलग्न महाराष्ट्र शिव माथाडी कामगार सेनेचे अध्यक्ष निलेश भोसले यांच्या सूचनेनुसार संघटनेच्या विविध पदाधिकाऱ्यांची नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

त्यामध्ये अरुणभाई स्वरूप, राजेंद्र यादव. उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य, प्रमोद सुर्वे समन्वयक महाराष्ट्र राज्य, सचिन मोरे रायगड जिल्हा अध्यक्ष यांची वरील पदी नियुक्ती करण्यात आली. याबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# माथेरान मधील विविध विकास कामांचे दुरदृश्य प्रणालीद्वारे उद्‌घाटन व लोकार्पण

**दै.रायगड नगरी । मुकूंद रांजाणे**

**माथेरान** : माथेरान मध्ये आजवरच्या कार्यकाळात न भूतो न भविष्यती अशाप्रकारे सर्व प्रकारची महत्वकांक्षी विकास कामे सन २०१९ ते २०२१ या अवघ्या कमी कालावधीत मार्गी लागली असून अल्पावधीतच अजूनही काही कामे प्रगतीपथावर आहेत ती सुद्धा पूर्णत्वास जाण्याच्या मार्गावर आहेत.

आज दि.३१डिसेंबर रोजी नगरपरिषदेतील सर्व सन्माननीय सदस्यांचा पाच वर्षांचा कार्यकाळ संपलेला असताना या सत्ताधारी गटाने शेवटपर्यंत या गावाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले आहेत त्यामुळे त्यांच्यावर विविध स्तरातून कौतुकाचा वर्षाव केला जात आहे.



पूर्ण झालेल्या विकास कामांचे दुरदृश्य प्रणाली द्वारे उद्घाटन व लोकार्पण विद्यमान नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी या दुरदृश्य प्रणालीच्या अविस्मरणीय सोहळ्यास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (आयुक्त)एस. व्ही. आर. श्रीनिवास,बृहन्मुंबई महानगरपालिका महापौर किशोरीताई पेडणेकर, कर्जत खालापूर विधानसभा संपर्क प्रमुख राजेश कुचिक, रायगड जिल्हाप्रमुख मनोहर भोईर,शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी, तसेच नगरसेवक/नगरसेविका उपस्थित होत्या.

या सर्व विकास कामांसह मुख्य प्रवेशद्वार असणाऱ्या दस्तुरी नाक्यावरील एमएमआरडीएच्या माध्यमातून पूर्ण झालेल्या वाहन पार्किंगचे उद्घाटन नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांच्या हस्ते करण्यात आले.त्याचप्रमाणे अन्य विकास कामे पूर्ण करण्यासाठी यामध्ये प्रामुख्याने झाडांना गॅबियन वॉल आणि सात पॉईंटचे सुधारीकरण आणि सुशोभीकरण कामी जवळपास १०७ कोटी रुपयांची तरतूद आवश्यक आहे यासाठीचा प्रस्ताव मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (आयुक्त)एस. व्ही. आर. श्रीनिवास यांच्याकडे सादर केला असून त्यांनी या कामासाठी सकारात्मक दुजोरा दिला असल्याने आगामी काळात हे गाव निश्चितपणे विकसित होण्याच्या दृष्टीने प्रगतीपथावर दिसत आहे.एमएमआरडीए च्या माध्यमातून होत असलेल्या कामांसाठी मागील नऊ वर्षांपासून कार्यकारी अभियंता अरविंद धाबे यांनी महत्वपूर्ण जबाबदारी पार पाडली आहे.

ब्रिटिश राजवटीत अर्थातच १७० वर्षांपूर्वी माथेरान हे सुंदर पर्यटनस्थळ वसविले आहे. ततेव्हापासून ते आजमितीपर्यंत या छोट्याशा गावात कुणीही पर्यावरण पूरक विकास कामे पूर्ण केली नाहीत की वरीष्ठपातळीवरून भरीव निधी उपलब्ध करून घेतला.

२०१६ मध्ये शिवसेनेची एकहाती सत्ता स्थापन झाल्यानंतर सुरुवातीला दोन वर्षे खूपच अडचणीचा काळ ठरला आहे तद्नंतर कार्यतत्पर मुख्याधिकारी म्हणून रामदास कोकरे यांच्या दीड वर्षांच्या काळात अनेक विकास कामे नगराध्यक्षा प्रेरणा सावंत आणि नगरपरिषदेचे गटनेते प्रसाद सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली मार्गी लागली आहेत.

# पनवेलची कन्या योगिनी पाटील ठरली महाराष्ट्राची सर्वोत्कृष्ट ज्युनियर बॉक्सर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

२६ डिसेंबर ते २९ डिसेंबर या कालावधीत सांगली येथे झालेल्या ३३व्या ज्युनियर महिला महाराष्ट्र राज्य बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये बॉक्सर्सच्या रायगड संघाने एक सुवर्ण आणि तीन कांस्यपदकांची कमाई केली आहे. या बॉक्सिंग स्पर्धेत ५० किलो वजनी गटात योगिनी पाटीलने पुणे, परभणी आणि जळगाव येथील प्रतिस्पर्ध्यांचा पराभव करत सुवर्णपदक पटकावले. त्यामुळे तिला चॅम्पियनशिपमधील सर्वोत्कृष्ट बॉक्सर म्हणून गौरवण्यात आले. तर मधुरा पाटील, उन्नती परदेशी आणि भाग्यश्री साळुंखे यांनी वजन गटात कांस्यपदक मिळवले.



या स्पर्धेत योगिनी पाटील हिला ४८-५० वजन गटात सुवर्णपदक मिळाले असून उत्कृष्ट बॉक्सर म्हणून तीचा सन्मान करण्यात आला. तसेच मधुरा पाटील हिला ५२-५४ वजनगटात कास्य पदक मिळाले. ५४-५७ वजन गटात उन्नती परदेशी हीने कास्य पदक पटकावले. तर भाग्यश्री साळुंखे हिला ५७-६० वजन गटात कास्य पदक मिळाले. विशेष म्हणजे बॉक्सर्स योगिनी पाटील आणि उन्नती परदेशी या दोघींचे कौशल्य आणि राज्य चॅम्पियनशिपमधील उत्कृष्ट कामगिरीबद्दल रोहतक, हरियाणा येथील राष्ट्रीय निवड चाचणी साठी महाराष्ट्राच्या टीम मधून निवड करण्यात आली आहे. स्पर्धेत घवघवीत यश प्राप्त केलेल्या पनवेलमधील बॉक्सर्स स्पर्धकांना पनवेलचे कोच अद्वैत शीमवणेकर तसेच पुण्यातील कोच तथा माजी ऑलिम्पियन मनोज पिंगळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभत आहे. पनवेलमधील या बॉक्सर्सने केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे, तसेच पुढील स्पर्धांसाठी भरभरून शुभेच्छाही दिल्या जात आहेत. बॉक्सर्स योगिनी पाटील आणि उन्नती परदेशी या दोघी स्पर्धकांची निवड चाचणीसाठी महाराष्ट्र टीम संघात निवड झाल्याने पनवेलच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. तसेच योगिनी पाटील आणि उन्नती परदेशी यांची राज्य चॅम्पियनशिपमधील उत्कृष्ट कामगिरीबद्दल, रोहतक, हरियाणा येथील राष्ट्रीय निवड चाचणी साठी टीम महाराष्ट्रातून निवड झाली आहे.

# शेतकरी विकास प्रतिष्ठान कृषी दिनदर्शिकेचे प्रकाशन

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुका शेतकरी विकास प्रतिष्ठान यांच्या विद्यमाने तयार करण्यात आलेल्या कृषी दिनदर्शिकेचा शानदार प्रकाशन सोहळा तालुक्यातील कृषीनिष्ठ बाहे गावातील जयश्री-नारायण फार्म हाऊस येथे ता.३० रोजी मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आले.

तालुका क्रुषी अधिकारी करे यांच्या हस्ते सदर दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी कृषी अधिकारी सुतार, पर्यवेशिका श्रीम. उबाळे,ग्रा. पं.सदस्या विलासिनी थिटे,प्रतिष्ठान अध्यक्ष गणेश भगत, उपाध्यक्ष अनंत मगर, सचिव पांडुरंग भेरे, खजिनदार जोशी, संचालक संतोष दिवकर, विजय दिवकर, दगडू बामुगडे, पानसरे, मोरे,खेळू थिटे, नारायण थिटे, खेळू थिटे, सुदाम महाडिक,नथुराम भोईर, राम मरवडे, अरविंद भिलारे, संजय मरवडे, नथुराम मगर, विठोबा थिटे,गोपाळ थिटे, पांडुरंग गोविलकर, सुनील चव्हाण, राजेश चव्हाण, गोपाळ ठाकूर, रमेश जाधव, खेळू मनवी, राजेंद्र थिटे, मारूती मनवी, प्रकाश थिटे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी रोहित देवकर, प्रतिक थिटे, नितेश जाधव,हर्षद टिकोणे,सूरज सालस्कर, किरण जाधव यांनी मोलाचे सहकार्य केले.तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन संतोष दिवकर यांनी केले व सुनील थिटे आभार व्यक्त करून कार्यक्रमाची यशस्वीरीत्या सांगता करण्यात आली.

# लायन्सक्लब आयोजित चिल्हे येथील नेत्र तपासणीला उत्स्फूर्त प्रतिसाद

## ११५ रुग्णांची तपासणी, 30 रुग्णावर होणार शस्त्रक्रिया

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

लायन्सक्लब ऑफ कोलाड रोहा लायन्स हेल्थ फाऊंडेशन अलिबाग, समता फाऊंडेशन मुंबई, गोदरेज फाऊंडेशन, लायन हेल्थ फाऊंडेशन व झोन चेअरपर्सन, यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच ग्रुप ग्राम पंचायत तळवली तर्फे अष्टमी व चिल्हे ग्रामस्थ यांच्या सहकार्यातून ३० डिसेंबर रोजी आयोजित केलेल्या मोफत नेत्र तपासणी व मोती बिंदू शस्त्रक्रियेला रुग्णांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला यात ११५ रुग्णांची तपासणी तर ३० रुग्णांवर मोफत केली जाणार आहे नेत्र चिकित्सा.



यावेळी कोलाड रोहा लायन्सक्लबचे मार्गदर्शक तथा झोन चेअरपर्सन लायन रविंद्र घरत, कोलाड रोहा लायन्सक्लबचे अध्यक्ष डॉ सागर सानप, सेक्रेटरी रविंद्र लोखंडे, खजिनदार डॉ श्याम लोखंडे, बोर्ड ऑफ डायरेक्टर अनिल महाडिक, लायन्स हेल्थ फाऊंडेशन अलिबाग डॉ स्मिता चौगले, डॉ सायली केणी, सुजित पाटील, शुभम जाधव, चेतना पॅथॉलॉजीच्या डॉ समृद्धी राणे, श्रुती ऑप्टिकल कोलाडचे विठ्ठल सावळे, ग्राम पंचायत सरपंच सौ रुपाली कोस्तेकर, उपसरपंच सौ मानसी लोखंडे, सदस्या सौ रिया लोखंडे, मा.उपसरपंच रघुनाथ कोस्तेकर, गावचे अध्यक्ष सुधीर लोखंडे, मंगेश लोखंडे, लायन नंदकुमार कळमकर, कल्पेश माने, राजेंदर कोप्पू, महेश तुपकर,सौ पूजा लोखंडे, जेष्ठ नागरिक गणपत शिंदे, सुरेश महाडिक, दगडू लाडगे, सह आदी मान्यवर व ग्रामस्थ व रुग्ण बहुसंख्येने उपस्थित होते ,

ग्रामीण आणि दुर्गम भागातील नागरिकांना नेत्र तपासणीचा व त्यांच्यावरील मोफत शस्त्रक्रियेचा लाभ मिळावा यासाठी लायन्सक्लबचे सर्व पदाधिकारी अधिक परिश्रम घेऊन या भागात काम असल्याचे मनोगत लायन रविंद घरत लायन डॉ सानप , डॉ स्मिता चौगले व गावचे अध्यक्ष सुधीर लोखंडे यांनी व्यक्त केले .तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लायन्सक्लब ऑफ कोलाड रोहा चे सर्व पदाधिकारी व ग्रामस्थ मंडळ चिल्हे यांनी अथक परिश्रम घेतले .

# ग्रुप ग्राम पंचायत मांदाटणे येथे परसबाग निर्मिती आणि महिला बचत गटांना प्रशिक्षण

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यातील ग्रुप ग्राम पंचायत मांदाटणे येथे या ग्रामस्थ, ग्रामपंचात सदस्य, महिला मंडळ यांना सरपंच चंद्रकांत पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या प्रशिक्षण कार्यक्रमात परसबाग निर्मित व महिला बचत गटांना प्रशिक्षण कार्यक्रम ग्रामपंचायतचे विद्यमान सरपंच चंद्रकांत पवार यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले.

या कार्यक्रमावेळी प्रमुख पाहुणे म्हणून म्हसळा तहसीलदार समीर घारे,मुंबई सहायक ट्रस्ट यांच्या वतीने अमेनिया फ्री व्हिलेज (शययुक्त ग्रामपंचायत) प्राथमिक स्तरावर जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. सदर कार्यक्रम अंतर्गत अतिश गायकवाड यांनी या कार्यक्रमा संदर्भात चांगल्या प्रकारे असे प्रशिक्षण दिले. तसेच प्रेरणा सामाजिक संस्था महाड या संस्थेचे अध्यक्ष कमलेश कोरपे यांनी महिला बचतगट व सक्षीमिकरण व परसबाग संदर्भात मार्गदर्शन केले. म्हसळा तहसीलदार यांनी घरातील पोषक आहार हा स्त्रीया आणि लहान मुले-मुली यांना किती पौष्टिक आहे याचे उत्कृष्ट असे उदा देऊन मार्गदर्शन केले, आणि असे कार्यक्रम तालुक्यामध्ये राबवण्यात यावे असे सांगण्यात आले. या कार्यक्रमासाठी जि. प.सभापती बबन मनवे, खामगाव सर्कल सलीम शाह, तलाठी शेळके, कळंबे, उपसरपंच शंकर गोरीवले, पोलीस पाटील स्नेहा पवार, गाव अध्यक्ष, महिला अध्यक्ष यांनी शुभेच्छा दिल्या.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील नमूद केलेली मिळकत ही जिया अ.सत्तार नम्रे यांचे नांवे आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : बीड, ता.पनवेल, जि.रायगड**

| मालक/कब्जेदाराचे नांव | सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|
| जिया अ.सत्तार नम्रे | ५२/0 | ०-१८-७० | २-१२ |

वर नमूद मिळकत माझे अशिलांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदी खत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले मालक / कब्जेदाराबरोबर ठरविलेला कायम खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ३१/१२/२०२१

सही/-
ॲड.गणेश एन. भोगाडे
बेसमेंट शॉप नं.३०, राजे कमर्शिअल कॉम्प्लेक्स, शिवाजी महाराज चौक, पनवेल, जि.रायगड
मो.नं.९३२४७२७४४६

## कर्जत नगर परिषद
KARJAT MUNICIPAL COUNCIL
ता.कर्जत, जि.रायगड, पिन-४१०२०१
Email : karjatcouncil@gmail.com ऑफिस : ०२१४८-२२२०३३

क्रकनप/भां.वि/२२३९/२१-२२ दिनांक : ३१/१२/२०२१

### जाहीर निविदा सूचना

कर्जत नगरपरिषदेकडून पात्रताधारक व इच्छुक वार्षिक ठेकेदार नेमणूक करणे करिता फेर निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा फॉर्म फी | अनामत रक्कम |
|---|---|---|---|
| १ | १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, जयंती-पुण्यतिथी तथा विविध कार्यक्रमांसाठी आवश्यक साहित्य, अल्पोपहार, जेवण, हार, बुके पुरविणे | ५००/- | २०००/- (D.D.भरणे) |

कामाच्या अटी व शर्ती :-

१) निविदा पत्रक विक्रीची तारीख दि.३/०१/२०२२ ते १२/०१/२०२२ पर्यंत असून निविदा स्वीकारण्याचा कालावधी दि.१४/०१/२०२२ रोजी सायं. ५ वाजेपर्यंत राहील.

२) निविदा उघडणेचा कालावधी १७/०१/२०२२ सायं.४ वा. किंवा प्रशासकीय सोयीनुसार राहील.

सही/-
(डॉ.पंकज पाटील)
मुख्याधिकारी
कर्जत नगरपरिषद, कर्जत

सही/-
(सुवर्णा केतन जोशी)
अध्यक्षा
कर्जत नगरपरिषद, कर्जत

## Panvel Municipal Corporation, Panvel

### जाहीर ई-निविदा सूचना

| अ. क्र. | कामाबाबत तपशिल | कामाची मुदत | बयाणा रक्कम | कोरी ई-निविदा फॉर्मची किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांच्या कोव्हीड चाचण्या (RTPCR) करणेकरिता उभारण्यात येणाऱ्या (RTPCR) केंद्राकरिता (RTPCR) व भविष्यात त्यानुषंगे होणाऱ्या इतर चाचण्या (S.Gen Detection Test) करिता प्रति चाचणी तत्वावर बाह्ययंत्रणेद्वारे कंत्राटी स्वरुपात दर देणे. (दररोज ५००० अंदाजे चाचण्या) | सहा महिने किंवा कोव्हीड-१९ परिस्थिती नियंत्रणात येईपर्यंत किंवा कोव्हीड असे पर्यंत जे लवकर होईल तोपर्यंत | रु.७५,०००/- | रु.४,५००+१८ (जी.एस.टी.) |

Key Dates :-

| Sr. No. | Description | Date | Time |
|---|---|---|---|
| 1 | Publish Date | 31/12/2021 | 12:00 |
| 2 | Document Download Start Date | 01/01/2022 | 12:00 |
| 3 | Document Download End Date | 06/01/2022 | 15:00 |
| 4 | Bid Submission Start Date | 31/12/2021 | 12:00 |
| 5 | Bid Submission End Date | 06/01/2022 | 15:00 |
| 6 | Bid Opening Date | 07/01/2022 | 11:00 |

**Note :** The bidders shall have to submit their bids online and upload the relevant documents as pey key schedule (key dates)

Sd/-
Signature of Tenderrer
Medical Officer of Health

# संक्षिप्त...

## राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या धडक कारवाई

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

दि.३० डिसेंबर व दि.३१ डिसेंबर २०२१ रोजी राज्य उत्पादन शुल्क चे आयुक्त श्री. कांतीलाल उमाप व विभागीय उपायुक्त कोकण विभाग, ठाणे श्री.सुनिल चव्हाण यांच्या आदेशानुसार रायगड राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक श्रीमती किर्ती शेडगे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य उत्पादन शुल्क मुरुड विभागाचे निरीक्षक श्री.आनंद पवार, दुय्यम निरीक्षक खालापूर, श्री.रितेश खंडारे, दुय्यम निरीक्षक श्री.मानकर, दुय्यम निरीक्षक रोहा श्री.संजय वाडेकर, सहाय्यक दुय्यम निरीक्षक श्रीमती रजनी नरहरी, जवान निमेश नाईक, जवान गणेश घुगे, महिला जवान श्रीमती अपर्णा पोकळे व महिला जवान वर्षा दळवी वाहनचालक नरेश गायकवाड व पंच या पथकाने गाव मौजे आंजरूंग,आदिवासी वाडी, ता.खालापूर येथे दि.३० डिसेंबर २०२१ रोजी गावठी हातभट्टी दारूची वाहतूक करणाऱ्यांवर छापा टाकून एक दुचाकी वाहन व दि. ३१ डिसेंबर २०२१ रोजी सकाळी ०७:४५ वाजता एक चारचाकी सेंट्रो वाहन एमएच-०४ बीक्यू ५९५८, दोनशे लिटर हातभट्टी दारूची वाहतूक करीत आसताना रोहा-चणेरा रस्त्यावर कुंभोशी गावाजवळ पाठलाग करून पकडले. या दोन्ही दिवशी केलेल्या कारवाई अंतर्गत नोंदविलेल्या गुन्ह्याचा तपशिल एकूण गुन्हे- ०२, वारस -०२, आरोपी- ०२,वाहन - १) होंडा क्टिवा दुचाकी ( नंबर नसलेली), २) सेंट्रो चार चाकी, एकूण हातभट्टी दारू- २६० लिटर, एकूण मुद्देमाल किंमत- रु. ९४ हजार १५०, असा असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क मुरुड विभागाचे निरीक्षक आनंद पवार यांनी दिली आहे.

## खोपटे ग्रामपंचायत तर्फे ५४५ हरकती दाखल

**दै.रायगड नगरी । उरण**

सिडको मुख्य नियोजनकार (नैना) बेलापूर, नवी मुंबई यांच्या कार्यालयात जाऊन खोपटे नवनगर प्रकल्पास विरोध म्हणून ग्रूप ग्रामपंचायत बांधपाडा खोपटे व ग्रामस्थ मंडळ खोपटे यांच्या तर्फे ५४५ वैयक्तीक हरकती दाखल करण्यात आले. सदर प्रसंगी ग्रूप ग्रामपंचायत बांधपाडा सरपंच विशाखा प्रशांत ठाकूर, उपसरपंच सुजित म्हात्रे, ग्रामपंचायतचे सर्व सदस्य, ग्राम अध्यक्ष विश्वनाथ पाटील, पाणी कमिटी सभापती महेंद्र पाटील, संजय ठाकूर, राजेंद्र म्हात्रे, सत्यवान भगत, प्रशांत ठाकूर इ.ग्रामस्थ उपस्थित होते. तसेच ज्या नागरिकांच्या हरकती नोंदवायच्या राहिल्या असतील अशा नागरिकांनी दिनांक ०५/०१/२०२२ पर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात जाऊन हरकती नोंदविण्या संदर्भात आवाहन करण्यात आले आहे.

# नवीन वर्षात पाली पाटणूस राज्यमार्ग रुंदीकरणाला वेग

### दुर्गम भागातील वाहतूक होणार सुरळीत, पर्यटन व रोजगार निर्मितीला चालना

**दै.रायगड नगरी । गौसखान पठाण**

**सुधागड/पाली** : अष्टविनायक तीर्थक्षेत्र पाली ते पाटणूस राज्यमार्ग क्रमांक ९४ या मार्गाच्या रुंदीकरणाला नुकतीच सुरुवात झाली आहे. नवीन वर्षाच्या अखेरीस या रुंदीकरणाचे काम ६० टक्के पूर्ण होण्याची शक्यता सार्वजनिक बांधकाम विभागाने वर्तविली आहे. या मार्गाचे रुंदीकरणामुळे येथील गावे व दुर्गम भागातील वाहतूक सुरळीत होणार आहे. शिवाय येथील पर्यटन व रोजगार निर्मितीला अधिक चालना व गती मिळेल.




नुकतेच या मार्गासाठी २ कोटी ७२ लाख ११ हजार रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे. या मार्गासाठी राज्य शासन ६० टक्के खर्च करणार असून ४० टक्के खर्च कॉन्ट्रॅक्टर करणार आहे. या मार्गाची सध्या रुंदी साडेपाच मीटर आहे. रुंदीकरणाद्वारे ती बाजू पट्टी वगळून ७ मीटर एवढी होईल. म्हणजे ७ मीटर रुंदीचा निव्वळ डांबरी रस्ता होणार आहे. पाली हे अष्टविनायक तीर्थक्षेत्र आहे. येथे विविध भागांतून मोठ्या प्रमाणात भाविक येत असतात. या मार्गाचे रुंदीकरण झाल्यास पुण्यावरून ताम्हिणी घाटमार्गे व तळ कोकणातून माणगाव मार्गे पालीत येणाऱ्या भाविकांचा प्रवास जलद व सुखकर होईल. शिवाय विळे-भागाड एमआयडीसी जवळच पाटणूस गाव असल्याने आजूबाजूच्या गावांतील तरुणांना रोजगारासाठी सहज येजा करता येईल.

पाली येथे शिक्षणासाठी येणारे शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची देखील चांगली सोय होईल. त्यांचा प्रवास जलद होईल. पाटणूस हद्दीत देवकुंड हे जगप्रसिद्ध निसर्ग पर्यटन क्षेत्र आहे. या मार्गाच्या रुंदीकरणामूळे येथे पोहचण्यास पर्यटकांना सोप्पे जाईल. त्यामुळे येथील पर्यटन वाढून रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील. पाली पाटणूस मार्गावरून विळे मार्गे पुणे आणि माणगावला देखील जाता येते. त्यामुळे मुंबई-पुणे तसेच कोकणात जाण्या-येण्यासाठी हा मार्ग महत्वाचा व सोईचा आहे. एकूणच या मार्गाच्या रुंदीकरणामूळे येथे आमूलाग्र बदल घडून येईल. वनविभागाच्या परवानग्या, खाजगी जागा हस्तांतरण योग्य प्रकारे झाल्यास व अचानक कोणती समस्या न उद्भवल्यास मार्ग लवकर पूर्ण होईल.

## नेरळ सेवानिवृत्त रेल्वे कर्मचारी संस्थेच्या हंगामी अध्यक्षपदी किसन खडे

**दै.रायगड नगरी । माथेरान**

कर्जत तालुक्यातील नेरळ येथील सेवानिवृत्त रेल्वे कर्मचारी संस्थेच्या हंगामी अध्यक्ष म्हणून किसन खडे यांच्यावर जबाबदारी देण्यात आली आहे. संघाचे अध्यक्ष कामगार नेते हरिचंद्र टोकरे यांचे कोरोना काळात निधन झाले आहे.नेरळ सेवानिवृत्त रेल्वे कर्मचारी संस्थेच्या वतीने आयोजित पेन्शनर डे कार्यक्रमात हंगामी अध्यक्ष निवडण्यात आला आहे.



नेरळ गावातील छत्रपती शिवाजी महाराज मैदानाच्या जवळ असून जेष्ठ नागरिक संघाच्या सभागृहात सेवानिवृत्त रेल्वे कर्मचारी संस्थेच्या वतीने पेन्शनर डेचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे अध्यक्ष हरिचंद्र टोकरे यांचे एप्रिल २०२१ मध्ये निधन झाले आहे. त्यामुळे पेन्शनर डे कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेचा हंगामी अध्यक्ष नेमण्यात आला. यावेळी किसन खडे या जेष्ठ सदस्य आणि संस्थेचे उपाध्यक्ष किसन खडे यांना हंगामी अध्यक्ष करण्यात आले.त्यानंतर आयोजित पेन्शनर डे कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी अध्यक्ष मनोहर हर्डीकर, सु.ना. गायकवाड़ यांच्यासह संस्थेचे कार्यवाह आंबो शिनारे,उपकार्यवाह प्रभाकर सारंग,खजिनदार रमेश गुरव, आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी माजी अध्यक्ष मनोहर हर्डीकर यांनी मार्गदर्शन करताना रेल्वे पेन्शनर यांनी संस्थेची नव्याने पुनर्रचना करण्यात आली आहे,त्याबद्दल आनंद व्यक्त केला. आता संस्था परत मागे जाता कामा नये यासाठी सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत असे आवाहन करीत आम्ही कधीही संस्थेच्या भरभराटीसाठी मागे उभे राहू असे आश्वासन दिले.तर माजी अध्यक्ष सु.ना गायकवाड यांनी संस्थेला सदस्यांनी आर्थिक मदत करावी अशी सूचना केली. यावेळी सांस्थेचे सभासद सूर्यकांत साळवे, मधू तरे, धोंडुराज बिवलकर, सुधीर खाणेकर, संदीप फणसे आदी उपस्थित होते. तसेच संस्थेने आयोजित केलेल्या पेन्शनर डे कार्यक्रमाला शुभेच्छा देण्यासाठी किशोर चवरे, यशवंत दाभणे, जाधव, रामचंद्र माळी, नारायण चंचे, कदम, निमणे, हे उपस्थित होते.

## विहिघरमध्ये विविध समाजोपयोगी कार्यक्रमाचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील विहिघर येथे नववर्षाच्या पहिल्या दिवशी म्हणजेच ०१ जानेवारीला साईबाबा मुर्ती स्थापना वर्धापनदिन सोहळा, श्री. सत्यनारायणाची महापूजा, तसेच चिपळे ग्रामपंचायतीचे उपसरपंच मंगेश पंढरीनाथ फडके यांच्या वाढदिवस समारंभानिमित्त विविध समाजोपयोगी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमांना अनेक अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

या कार्यक्रमास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार महेंद्र दळवी, आमदार शशिकांत शिंदे, आमदार महेंद्र थोरवे, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष संजय पाटील, शिवसेनेचे जिल्हा सल्लागार बबन पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सकाळी ८ वाजता श्री साईबाबा मुर्ती स्थापना वर्धापनदिन व अभिषेक, दुपारी १२ ते सायंकाळी ०६ वाजेपर्यंत कुस्त्यांच्या दंगली, दुपारी ०२ वाजता श्री सत्यनारायणाची महापूजा, सायंकाळी ०५ वाजता ह. भ. प. शंकर महाराज आंग्रे आणि मंडळींचा त्रिवेणी संगम हरिपाठ शिवकर यांचे हरिपाठ, सायंकाळी ०६ वाजता उपसरपंच मंगेश पंढरीनाथ फडके यांचा वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा होणार आहे. रात्री ०९ वाजता जय भवानी प्रासादिक भजन मंडळ वडगाव यांचे तर रात्री १०. १५ वाजता श्री डांगर्णेश्वर सांप्रदायीक वारकरी भजन मंडळ मोरबे यांचे वारकरी जोड भजन होणार आहे. कुस्त्यांच्या दंगलीत किताब पटकाविणाऱ्या कुस्तीपटूस २५ हजार रुपये व चार फूट गदा, द्वितीय क्रमांकास १५ हजार रुपये व ३ फूट गदा तर तृतीय क्रमांक १० हजार रुपये व अडीच फूट गदा देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमांचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य बैलगाडी रेस संघटनेचे अध्यक्ष तसेच माजी सरपंच पंढरीनाथ फडके आणि कुटुंबीयांनी केले आहे.

## शहिदपत्नी भाविका मोरे आणि कालवलीचे राष्ट्रपती पदक प्राप्त शांताराम महाडीक यांचा सत्कार



**दै.रायगड नगरी । शैलेश पालकर**

**पोलादपूर** : तालुक्यातील कोंढवी येथील शहिद भरत मोरे यांच्या पत्नी भाविका मोरे आणि कालवली येथील राष्ट्रपती पदक प्राप्त शांताराम महाडीक यांचा कल्याण येथील बी.के.बिर्ला कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्सतर्फे आयोजित करण्यात आलेल्या कारगिल विजयदिन सोहळ्यानिमित्त कार्यक्रमामध्ये सत्कार करण्यात आला. या कार्यक्रम ावेळी लष्करी थाटात आयोजन करण्यात आल्याने सर्वांनाच अप्रूप वाटत होते.

कल्याण येथील बी.के.बिर्ला कॉलेजच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त एनसीसी युनिटने शहिद जवानांच्या कुटूंबियांचा तसेच विशेष सेवा पदक प्राप्त जवानांचा सत्कार करण्याचा कार्यक्रम कारगिल विजय दिनानिमित्त आयोजित केला असता पोलादपूर तालुक्यातील कोंढवी येथील कारगिल युध्दामधील शहिद जवान भरत मोरे यांच्या पत्नी भाविका मोरे तसेच ऑपरेशन मेघदूतमध्ये विशेष सेवा पदक प्राप्त झालेले कालवली गावाचे सरपंच व सेवानिवृत्त सैनिक शांताराम महाडीक यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी रोझ क्लब कल्याणचे प्रेसिडेंट संतोष चितलांगे तसेच सेन्चुरी रेयॉन शहाडचे गव्हर्निंग कौन्सिलचे चेअरमन ओ.आर.चितलांगे, प्राचार्य डॉ.अविनाश पाटील आणि एज्युकेशन डायरेक्टर डॉ. नरेश चंद्रा यांच्यासह एनसीसीचे कॅडेटस् आणि भारतीय सेनादलातील रिटायर्ड अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कारगिल विजय दिनानिमित्त झालेल्या या सैन्यदलाशी संबंधित व्यक्तींचा व शहिद कुटूंबियांच्या गौरवाच्या कार्यक्रमामध्ये पोलादपूर तालुक्यातून शहिदपत्नी भाविका भरत मोरे आणि कालवलीचे सरपंच शांताराम महाडीक यांना गौरविण्यात आल्याने पोलादपूर तालुक्यात सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

## २ जानेवारी रोजी मान्यवरांच्या हस्ते होणार द्रोणागिरी महोत्सवाला प्रारंभ


**दै.रायगड नगरी । उरण**

द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशन तर्फे जिल्हा स्तरीय २१ वा युवा महोत्सव दि २ ते ६ जानेवारी २०२२ दरम्यान एन एम एस ई (सेझ )मैदान, पोलीस चौकी जवळ, केअर पॉईंट हॉस्पिटल समोर,बोकडवीरा, तालुका उरण येथे मोठ्या थाटामाटात मान्यवरांच्या उपस्थितीत कोरोना विषयक सर्व नियम व अटींचे पालन करत सोशल फिजिकलं डिस्टन्स पाळून मास्क व सॅनिटायझरचा वापर करून नियमांच्या अधीन राहून संपन्न होणार असून विविध देशी विदेशी असे १३२ हुन अधिक स्पर्धांचा या म्ह-ोत्सवात समावेश आहे. यावर्षी या स्पर्धेचे उदघाटन रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री आदितीताई तटकरे यांच्या हस्ते होणार असून अनेक मंत्री, दिग्गज नेते, विविध सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रातील नामवंत प्रसिद्ध व्यक्ती, सर्वच राजकीय पक्षाचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत हा महोत्सव संपन्न होणार आहे.

पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे, रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री आदितीताई तटकरे, महाराष्ट्र राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, क्रीडा मंत्री सुनील केदार, मावळ लोकसभा मतदार संघांचे खासदार श्रीरंग बारणे, आमदार भरत गोगावले, आमदार महेंद्र दळवी, आमदार महेंद्र थोरवे, शेतकरी कामगार पक्षाचे नेते तथा आमदार बाळ-ाराम पाटील, माजी आमदार मनोहरशेठ भोईर, काँग्रेस नेते महेंद्र घरत, आर सी घरत, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे महाराष्ट्र राज्य प्रदेश सरचिटणीस प्रशांत पाटील, भावना घाणेकर, डॉ मनिष पाटील, जे एन पी टी चे विश्वस्त दिनेश पाटील, भूषण पाटील, उद्योगपती राजेश डाके, दिपक शेलार-शेलार मामा यांचे वंशज, नारायण कलमबे-नरवीर तानाजी मालु-सरे यांचे वंशज( मुलगी उमा कडून ,रमेश सोनावणे-महावीर चक्राने सन्मानित कृष्णाजी सोनावणे यांचे सुपुत्र, उत्तम पिंपळे-पालघर शिवसेना जिल्हाप्रमुख तथा माजी महापौर,योगेश अवसरे-सिने अभिनेता, मनीष ठोंबरे-चित्रपट कलावंत, सरिता खेरवासिया-सिने अभिनेत्री, तारादीदी-प्रजापिता ब्राह्मकुमारी ईश्वरीय विद्यालय पनवेल सेवा केंद्र प्रमुख, संतोषदीदी-अध्यक्ष सहयोग स्नेह सेवा संस्थांन, डॉ मधु मिलिंद निमकर-रायगड सुंदरी, साक्षी परांजपे-सिने अभिनेत्री, वर्षा पडवळ...सिने अभिनेत्री प्रमुख मान्यवरांची उपस्थिती यावेळी असणार आहे.

तसेच द्रोणागिरी भूषण पुरस्कार, विशेष पुरस्कार विविध क्षेत्रातील मान्यवरांना देण्यात येणार आहे. तरी जास्तीत जास्त रसिक प्रेषक वर्गांनी या महोत्सवात सहभागी व्हावे असे आवाहन द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष महादेव घरत यांनी केले आहे.

## पेण मधून अडीच लाखांचा गांजा जप्त



**दै.रायगड नगरी । पेण**

पेण शहरातील नवीन वसाहत फणस डोंगरी येथील घरात विक्रीसाठी आणलेला अडीच लाख रुपये किंमतीचा वीस किलो गांजाचा साठा जप्त करून आरोपी सुशील जोशी याला रायगड गुन्हे अन्वेषण शाखेने अटक केली आहे.

या बाबत सविस्तर वृत्त असे कि, पेण शहरातील नवीन वसाहत येथे गांजा विक्री होत असल्याची गुप्त खबर रायगड गुन्हे अन्वेषण विभागाच्या अलिबाग येथील अधिकाऱ्यांना मिळाली होती.

त्या अनुषंगाने गुन्हे अन्वेषण विभागाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ठाकूर, पोलीस हवालदार सुधीर मोरे, जितेंद्र चव्हाण, अमोल हंबीर, सावंत पोलीस नाईक म्हात्रे, लंबोटे यांच्या पथकाने गुरुवारी पेण शहरातील फणसडोंगरी नवीन वसाहत येथील सुशील राजाराम जोशी ( वय ३५) याच्या कडे सफेद गोणी मध्ये २० किलो ७४० ग्राम गांजा पकडण्यात आला. या प्रकरणी आरोपी सुशील जोशी विरोधात गुन्हा रजिस्टर क्र.२६१ / २०२१ एन.डी.पी.एस. अधिनियम १८८५ , १८८५ ८ (क) २० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पेण पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक नरेंद्र पाटील हे करत आहेत.

## पनवेल महापालिकेची डीमार्टवर कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोना नियमांचे उल्लंघन केल्याने पनवेल महानगरपालिकेने खारघरमधील डी-मार्टवर कारवाई करून त्यांना २५ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाच्या नियमानुसार रात्री ९ नंतर व्यावसायिक आस्थापने बंद करण्याच्या सुचना आहेत. हे नियम डावलून खारघर परिसरातील डी-मार्टमध्ये रात्री उशिरापर्यंत व्यवहार सुरू असल्याचे आढळून आले. त्याचप्रमाणे येथे प्रमाणापेक्षा अधिक गर्दी निदर्शनास आल्याने प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी यांनी डी-मार्टवर कारवाई करत त्यांचे दरवाजे सिल केले होते. मात्र त्यानंतरही सिल केलेले शटर बंद ठेवून दुसरे शटर उघडून त्यांनी व्यवहार सुरू केला. हे निदर्शनास आल्यानंतर डी-मार्ट व्यवस्थापना विरोधात पालिकेने दुसऱ्यांदा कारवाई करत त्यांना २५ हजाराचा दंड ठोठावला आहे.

## सोमजाई माता क्रीडा मंडळाच्या क्रीडा स्पर्धा संपन्न

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

सोमजाईमाता क्रीड़ा मंडळ रज़ी. ट्रस्ट खरसई या सेवाभावी म्हणून रायगड जिल्ह्यात अग्रगण्य असणाऱ्या संस्थेच्या माध्यमातून कला, क्रीड़ा, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक या क्षेत्रात कार्यरत असून गेली ५० वर्षा पेक्षा अधिक काळ सेवा करत असताना गेली ४० वर्ष शैक्षणिक विभागात गरजू विद्यार्थी, विद्यार्थिनींना दत्तक ( शैक्षणिक ) मोफत, वहया शालेय उपयोगी साहित्य वितरण करणे, क्रीड़ा स्पर्धा भरवणे, व्यायमशाळा उभारून तरुणांना शरीरसंपदा सदृढ़ बनवणे, या करीता आधुनिक साहित्य उपलब्ध करुण देणे, ग्रामस्थांच्या सार्वजानिक कार्यात निधी उपलब्ध करुण देणे असे अनेक कार्य संस्थेच्या माध्यमातून सुरु आहेत.

कोविड १९ महामारी मुळे गेल्या दोन वर्ष शाळाच बंद स्थितित असल्या कारणाने शैक्षणिक कार्य थांबले होते. यंदा मात्र शाळा पुन्हा सुरु होताच सन. २०१९-२० मधील गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांचा गुणगौरव सत्कार आणि १२० विद्यार्थ्यांना ( मुले,मूली ) विनामूल्य वह्या वितरीत करण्यात आल्या.

रा.जि.प.शाळा खरसई हि शाळा आदर्श शाळा व्हावी या करीता शाळेच्या हॉल मध्ये रंगमंच ( स्टेज ) असावा असा प्रस्ताव शिक्षण समिती, शिक्षक वृंद यांचे कडून आला असताना स्टेज उपरोक्त संस्थेच्या वतीने स्वखर्चाने बांधून देण्याचे घोषित करण्यात आले.

या कार्यक्रमास संस्थेचे संस्था प्रमुख चंद्रकांत.का. खोत (कामगार भूषण ), सरपंच निलेश मांदाडक़र, जगदीश खोत, सौ.भारती शितकर, सौ.दीपाली कांबळे, सौ.जयश्री मांदारे (ग्रा. प. सदस्य ), पांडुरंग माळी, महादेव मांदारे, प्रभाकर कांबळे, नरेश काताळकर, संस्थेचे पदाधिकारी, पालक वर्गाच्या उपस्थितीत अत्यंत उल्हासमय वातावरणात हा शैक्षणिक उपक्रम संपन्न झाला.

या वेळी मा.सरपंच निलेशजी मांदाडक़र यांनी आपली शाळा तालुक्यात, जिल्ह्यात नव्हे तर राज्यात आदर्श शाळा गणली जावी या करीता सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे. असे आवाहन सर्वांन केले. संस्था प्रमुखांनी जि.प. शाळा टिकल्या पाहिजे त्यातून दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे, आम्ही संस्था म्हणून कायम शाळेच्या सहकार्यास तयार आहोत. असे मनोगत व्यक्त केले रामचंद्र पयेर, काशीनाथ कोकाटे, शिक्षकवृंन्द, पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.